**नियमित दिवाणी दावा क्र. ६४/२०२३**

*CNR No. MHSO060011912023*

हणमंत सपताळ

*वि.*

उपविभागीय अभियंता, जिल्हापरिषद

सार्वजनिक बांधकाम उपविभाग,सांगोला वगैरे

## निशाणी क्र. १९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करुन विनाकैफियत आदेश रद्द करण्यासाठी दिलेला आहे. त्याचे कथन आहे की, प्रतिवादी हे जिल्हापरिषद, सोलापूर यांचे अधिकारी असल्याने कार्यालयीन व्यापामुळे त्यांना कागदपत्रांची वेळेत उपलब्धता झालेली नाही. त्यामुळे ते वेळेत कैफियत दाखल करु शकलेले नाहीत. दावा हा सार्वजनिक दळणवळण रस्त्याबाबत असल्याने गुणवत्तेवर निकाली काढणेकामी त्यांना कैफियत देण्याची परवानगी आवश्यक आहे. सबब, विनाकैफियत आदेश रद्द करण्यात येऊन कैफियत स्वीकारण्यात यावी.

०२. वादीतर्फे म्हणणे मांडण्यात आले की, अर्जातील नमूद कारण काल्पनिक आहे. केवळ कामकाज लांबविण्याच्या दृष्टीने वादीने वेळेत कैफियत दिलेली नाही. करीता, अर्ज नामंजूर करण्यात यावा, विकल्पे खर्च देण्यात यावा.

०३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दावा हा कायमचा मनाई मिळण्यासाठी दाखल आहे. दाव्याचे स्वरुप पहाता प्रतिवादीस संधी देणे योग्य होईल. करीता, पुढील आदेश.

## आदेश

१. अर्ज रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त)च्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने खर्चाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. खुल्या न्यायालयात घोषित.

NILESH SUBHASH BUDRUK Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK Date: 2024.04.23 16:36:32 +0530

दि. २३.०४.२०२४

( नीलेश सु. बुद्रुक )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,

पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 23/04/2024 |
| Order uploaded on | : | 23/04/2024 |